दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३४३ वा • मंगळवार, ता. ०१ जुल २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

# बुद्धाला स्वीकारण्यासाठी पाली भाषेकडे वळले पाहिजे- डॉ. सबनीस

## पहिले पाली- मराठी साहित्य संमेलन संपन्न

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**


मानवतेची भूमिका हाच बुद्धिवादी माणसांसमोर एकमेव पर्याय आहे; तसेच बुद्धाला स्वीकारण्यासाठी प्राचीन पाली भाषेकडे वळले पाहिजे! असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी शनिवारी ता. २८ जून रोजी आष्टा, तालुका वाळवा येथे केले.



लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान, पिंपरी - पुणे आणि संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या पाली - मराठी साहित्य संमेलनात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. ज्येष्ठ कविवर्य डॉ. विठ्ठल वाघ, स्वागताध्यक्ष अण्णा डांगे, लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. तारा भवाळकर यांनी, मातृभाषेचा पाया भक्कम असेल तर जगातील कोणतीही भाषा पंधरा दिवसांत शिकता येते! असे मत मांडले. याप्रसंगी डॉ. सुनीलकुमार लवटे (लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार), ॲड. चिमण डांगे (अहिल्याबाई होळकर पुरस्कार), डॉ. पल्लवी बनसोडे (लोकशिक्षक बाबा भारती स्नेहबंध पुरस्कार), सुधीर सूर्यगंध, श्रीकांत आढाव, डॉ. कामायनी सुर्वे, डॉ. संगीता अहिवळे, प्रकाश कांबळे (लोकशिक्षक बाबा भारती साहित्य पुरस्कार) प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

पुरस्काराला उत्तर देताना डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी, अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असताना मराठी आणि पाली या दोन्ही भाषांचे आकलन अन् विकास यासाठी हे संमेलन महत्त्वाची भूमिका पार पाडते आहे! अशी भावना व्यक्त केली. पुरुषोत्तम सदाफुले यांनी लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांच्याशी प्रकट मुलाखतीच्या माध्यमातून सुसंवाद साधला. त्यामध्ये पाली भाषेचा प्रसार करण्यासाठी दर महिन्याला एक कार्यशाळा आयोजित करून लोकशिक्षक बाबा भारती यांचे पाली भाषेच्या संदर्भातील कार्य दूरपर्यंत पोहोचविण्याची ग्वाही महेंद्र भारती यांनी दिली.

पाली भाषा : संकल्पना व स्वरूप या परिसंवादात डॉ. केशव देशमुख, मनीषा भोसले, सुगंधा वाघमारे यांनी सहभाग घेतला; तसेच डॉ. विठ्ठल वाघ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कविसंमेलनात अभिजित पाटील, लता ऐवळे - कदम, रमजान मुल्ला, धर्मवीर पाटील, राजेंद्र वाघ, सुनील जवंजाळ, उत्तम सावंत, आनंद हरी यांनी वैविध्यपूर्ण कवितांचे प्रभावी सादरीकरण केले. संमेलनाच्या समारोप प्रसंगी आमदार जयंत पाटील, प्रा. शामराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सीमा गांधी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले.



# अशोकस्तंभ काढून संविधानाची पायमल्ली सरकारने ठरवली का?

## आमदार रोहित पवारांचा सवाल

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानभवन प्रवेशद्वारावरील अशोकस्तंभ हटवून संविधानाचा अपमान करण्याचा सरकारचा हेतू आहे का? असा थेट आणि परखड सवाल शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी विचारला आहे.

यासंदर्भात अधिक माहिती देताना आमदार पवार म्हणाले, ''अलीकडेच अंदाज समितीच्या पोस्टरवरून अशोकस्तंभ काढून सेंगोल लावण्यात आला होता. आता तर थेट विधानभवनाच्या प्रवेशिकेवरील अशोकस्तंभ हटवण्यात आल्याची घटना घडली असून, हा प्रकार संविधानविरोधी आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार झुगारणारा आहे.'' ते पुढे म्हणाले, ''एकीकडे पत्रकार परिषदांमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन त्यांच्याविषयी आदर व्यक्त केला जातो आणि दुसरीकडे त्यांनी निर्माण केलेल्या संविधानातील प्रतीकांची पायमल्ली केली जाते, हे अत्यंत दुटप्पी आणि ढोंगी वर्तन आहे.'' ''सत्यमेव जयते हे तत्वच सरकारला नकोसे वाटते का?'' असा बोचरा सवाल करत रोहित पवार यांनी सरकारने असा दुटप्पीपणा सोडून देण्याचा सल्ला दिला. या घडामोडींमुळे विधानभवनात आणि राज्याच्या राजकारणात नव्या वादळाला तोंड फुटले असून, विरोधकांकडून सरकारवर संविधानाच्या अपमानाचा आरोप सुरू झाला आहे.

# मनपाची डॅशिंग नारी... अमेरिकेत ठरली सर्वात भारी...

## जागतिक स्पर्धेमध्ये शुभांगीला कांस्यपदक

**पनवेल । श्रीकांत काकतीकर**

पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील डॅशिंग महिला कर्मचारी शुभांगी संतोष घुले यांना अमेरिका येथील अल्बामा येथे नुकत्याच संपन्न झालेल्या २१ व्या जागतिक पोलिस व अग्निशमन स्पर्धेमध्ये कांस्य पदक मिळाले आहे. उत्तुंग अशा या यशाबद्दल मनपाचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी शुभांगी यांचे विशेष अभिनंदन केले. अल्बामा,अमेरिका येथे शुभांगी संतोष घुले हिने भारत देशाच्या संघात सहभागी होऊन २०२५ च्या २१ व्या जागतिक पोलिस व अग्निशमन स्पर्धेत '' ''या खेळात कांस्य पदक मिळवून भारताचे नाव पुन्हा एकदा उज्ज्वल केले. या स्पर्धेतील तिचा हा पराक्रम देशाच्या क्रीडा क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.



**शुभांगीची प्रतिक्रिया**

**''ही स्पर्धा माझ्यासाठी एक महत्त्वाचा अनुभव होता. माझ्या प्रशिक्षकांचे आणि कुटुंबीयांचे समर्थन नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. यापुढेही मी अधिक मेहनत करू आणि भारताचे नाव उच्च ठरवण्याचे काम करीन.''**

अल्बामा येथे २०२५ मध्ये झालेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत, जगातील अग्निशमन आणि पोलिस दलांचे उत्कृष्ट संघ सहभागी झाले होते.ही स्पर्धा अग्निशमन, पोलिस दल आणि बचाव कार्यातील व्यावसायिक कौशल्यांची चाचणी घेणारी होती. यात जगभरातून ५० देश सहभागी झाले होते. शुभांगीने इतर देशांच्या स्पर्धकांशी सामना करत, या कठीण आणि तडफदार स्पर्धेत आपला जलद आणि उत्कृष्ट कामगिरीचा दाखला देत कांस्य पदक प्राप्त केले. या दैदिप्यमान कामगिरीबद्दल अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे तसेच महानगरपालिकेचे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी शुभांगी यांचे अभिनंदन केले आहे.



# वैद्यकीय सेवेचा समाजाला उपयोग झाला पाहिजे : पद्मश्री नाना पाटेकर

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

डॉक्टरांनी सेवाभावी वृत्ती जोपासत वैद्यकीय सेवा करण्यासाठी पुढे आले पाहिजे. वैद्यकीय सेवेचा समाजाला उपयोग झाला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रपट अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर यांनी केले आहे. बेळगावच्या काँग्रेस टिळकवाडी येथे सेंट्राकेअर रुग्णालयाचा उद्घाटन समारंभ काल रविवारी पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री नाना पाटेकर यांच्यासह, शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे, राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री लक्ष्मी हेब्बाळकर,बेळगाव उत्तरचे आमदार राजू शेठ, केएलई संस्थेचे कार्याध्यक्ष डॉक्टर प्रभाकर कोरे, सेवासेवादनच्या संचालिका डॉक्टर अमृता दाते व्यासपीठावर उपस्थित होते. रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉक्टर नीता देशपांडे यांनी यावेळी प्रास्ताविक केले त्याचबरोबर रुग्णालयाची सविस्तर माहिती दिली. रुग्णालयाचे संचालक दीपक करंजीकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पुढे बोलताना नाना पाटेकर म्हणाले,एकदा रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यानंतर त्याचे सुखदुःख जाणून घेण्यासाठी कार्यरत होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.आपण आत्मकेंद्रीत होत आहोत. समाजात जाती धर्माच्या भिंती नसाव्यात.रुग्णांशी आत्मियतेचे नाते जोडले जावे. आपणा सर्वांना एकमेकांची गरज आहे.मरताना स्वतःबद्दल आदर वाटला पाहिजे. वैद्यकीय सेवा देतात आपला फायदा कमी ठेवून समाजाची सेवा करावी.त्याचबरोबर स्वतःलाही आरोग्यपूर्ण ठेवण्याचा प्रयत्न करा.म्हातारे पहा पण थकून जाऊ नका. असे मत ही पाटेकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान व्यासपीठावरील पाहुण्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

# महावितरणची 'गो-ग्रीन' योजना ५ लाखांवर ग्राहकांना ६ कोटींचा फायदा

**मुंबई । शफीक बागवान**

वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ इमेल व एसएमएसचा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये ५ लाखांचा टप्पा गाठला आहे. या योजनेत सोमवार (दि. ३०)पर्यंत सहभागी झालेल्या ५ लाख ३ हजार ७९५ वीजग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी गो-ग्रीन योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल ॲप व .. संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी गो-ग्रीन योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

वार्षिक १२० रूपयांचा फायदा - महावितरणकडून पर्यावरणपूरक गो-ग्रीन योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त इमेल व एसएमएसचा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती.पर्यावरणस्नेही ५ लाख ग्राहकांचा प्रतिसाद - वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे.


या योजनेत आतापर्यंत ५ लाख ३ हजार ७९५ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार ४०० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये (कंसात आर्थिक फायदा रूपयांत) पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक २ लाख १ हजार २३३ (२.४२ कोटी), कोकण- १ लाख १३ हजार २५४ (१.३६ कोटी), उत्तर महाराष्ट्र- ७० हजार २२६ (८४.२७ लाख), विदर्भ- ६३ हजार ७३१ (७६.४७ लाख) तसेच मराठवाड्यामध्ये योजनेत सहभागी ५५ हजार ३५१ वीजग्राहकांना ६६ लाख ४२ हजार रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे. गो-ग्रीन योजनेचे फायदे - महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत इमेलवर व मोबाईलवर एसएमएसद्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते. यासह महावितरणच्या .. या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

## अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा पुरस्कार वितरण सोहळा २ जुलै रोजी मुंबईत

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेतर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना सन्मानित करण्यासाठी पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा बुधवारी २ जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ५ वाजता मुंबई मराठी पत्रकार संघ, पत्रकार भवन, आझाद मैदान, मुंबई येथे हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. नरेन्द्र जाधव (ज्येष्ठ विचारवंत) असतील तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एस.एम. देशमुख (मुख्य विश्वस्त, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, मुंबई) हे राहणार आहेत. बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार मधुकर भावे (ज्येष्ठ पत्रकार) यांना दिला जाणार असून यावेळी विशेष सन्मान ज्येष्ठ नाट्यकर्मी भरत जाधव यांचा होणार आहे. त्याचबरोबर आचार्य अत्रे स्मृती संपादक पुरस्कार महेश म्हात्रे. पत्रकार भगवंतराव इंगळे स्मृती पत्रकारिता पुरस्कार पांडुरंग पाटील. सावित्रीबाई फुले स्मृती पत्रकारिता पुरस्कार श्रीमती सीमा मराठे. शशिकांत सांडभोर स्मृती पुरस्कार- अभिजित करांडे. पत्रकार प्रमोद भागवत स्मृती शोध पत्रकारिता पुरस्कार अमेय तिरोडकर. नागोजीराव दुधगावकर स्मृती पुरस्कार सर्वोत्तम गावस्कर. दत्ताजीराव तटकरे स्मृती पुरस्कार- दिनेश केळुस्कर. स्वातंत्र्यसैनिक स्व. माणिकराव देशमुख कृषी पत्रकारिता पुरस्कार- बाळासाहेब पाटील. स्वातंत्र्यसैनिक मनोहरपंत चिवटे आरोग्य पत्रकारिता पुरस्कार श्रीमती शर्मिला कलगुटकर. संतोष पवार आदर्श प्रसिद्धी प्रमुख पुरस्कार भरत निगडे दिले जाणार आहेत. कार्यक्रमाच्या आयोजनात मिलिंद आष्टिवकर, किरण नाईक, शरद पाबळे, शिवराज काटकर, प्रा. सुरेश नाईकवाडे, मन्सुरभाई शेख, अनिल वाघमारे, शोभा जयपूरकर, विशाल परदेशी, दीपक कैतके, राजा आदाटे, संजय मिस्कीन, विनायक सानप, दीपक पवार, पांडुरंग म्हस्के आदीची विशेष भूमिका आहे. या पुरस्कार सोहळ्यास महाराष्ट्रातील पत्रकार, लेखक, संपादक आणि वाचकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, हे एक प्रेरणादायी आणि गौरवशाली सोहळा ठरणार आहे.



# राज्याचे नवे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी स्विकारला पदभार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांनी काल ता.३० जून रोजी अधिकृतरित्या आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांनी मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून पदभार घेतला. राज्य शासनाच्या प्रशासकीय व्यवस्थेतील सर्वोच्च पदावर निवड झाल्यानंतर राजेश कुमार यांनी आज मंत्रालयात झालेल्या छोटेखानी समारंभात सूत्रे हाती घेतली. सुनियोजित प्रशासन, पारदर्शक कारभार आणि जनहितासाठी कार्य करण्याचा आपला प्रयत्न राहील, असे श्री. कुमार यांनी पदभार स्विकारल्यानंतर सांगितले. मुख्य सचिवपदावर कार्यरत राहिलेल्या सुजाता सौनिक यांनी आपल्या कार्यकाळात प्रशासनातील अनेक महत्त्वाचे निर्णय प्रभावीपणे अंमलात आणले. त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल शासनामार्फत सन्मान व्यक्त करण्यात आला. राजेश कुमार हे भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी असून, त्यांनी याआधी राज्य व केंद्र शासनाच्या विविध खात्यांमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.



# रस्त, पाणीप्रश्न सोडवल्याबद्दल अविनाश घुले यांचा सत्कार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सारसनगर व आशीर्वाद कॉलनी परिसरातील साईलीला रेसिडेन्सीमधील दीर्घकालीन रस्ता व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न माजी नगरसेवक अविनाश घुले यांच्या पुढाकाराने अखेर मार्गी लागला आहे. याबद्दल रहिवाशांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारप्रसंगी राजेंद्र सोनी, माधव शिंदे, आदेश पटनी, सागर मेहेर, प्रतीक कटारिया यांच्यासह अनेक रहिवासी उपस्थित होते. साईलीला रेसिडेन्सीतील रहिवासी गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याच्या दुरवस्था आणि पाण्याच्या तुटवड्यामुळे त्रस्त होते. मनपा व लोकप्रतिनिधींना वेळोवेळी निवेदन देऊनही यावर तोडगा निघत नव्हता.



मात्र, या समस्यांची गंभीर दखल घेत माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी मनपा प्रशासनाच्या सहकार्याने रस्त्याचे डांबरीकरण तसेच नवीन पाणीपुरवठा पाइपलाईनचे काम तातडीने पूर्ण करून दिलासा दिला. पिण्याच्या पाण्याचा अत्यंत अपुरा पुरवठा व खराब रस्त्यांमुळे महिलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच नाहक त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे या प्रश्नांची तातडीने दखल घेऊन माजी नगरसेवक घुले यांनी नागरिकांच्या हितासाठी आवश्यक उपाययोजना केल्या. या प्रसंगी बोलताना अविनाश घुले म्हणाले, ''जनतेच्या समस्या सोडवणे हेच माझं काम आहे. नागरिकांचा विश्वास जपणे हीच माझी खरी जबाबदारी आहे. साईलीला रेसिडेन्सीतील पाणी व रस्ता समस्या फार जुनी होती. ती सोडवण्यासाठी मी कटिबद्ध होतो आणि अखेर त्या समस्या दूर करण्यात यश मिळालं. भविष्यातही नागरिकांच्या हितासाठी अशीच कामगिरी करत राहीन.'' रहिवाशांच्या वतीने बोलताना राजेंद्र सोनी म्हणाले, ''आमच्या भागातील रस्ता व पाण्याची समस्या खूप जुनी होती. अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष दिलं आणि काम मार्गी लावलं. त्यांच्या तत्परतेमुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला असून, आम्ही त्यांच्या आभारी आहोत.''

# हिंदी सक्तीचा निर्णय रद्द : मनसेचा फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

राज्य सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने दिल्लीगेट येथे जल्लोषात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी फटाक्यांची आतषबाजी, जोरदार घोषणाबाजी आणि मिठाई वाटप करत पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले. या आनंदोत्सवाला शहर सचिव डॉ. संतोष साळवे, महिला जिल्हाध्यक्षा ॲड. अनिता दिघे, शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे, दीपक दांगट, संदीप चौधरी, किरण रोकडे, विभाग अध्यक्ष प्रशांत जाधव, तसेच कार्यकर्ते आरती उफाडे, संकेत पाळंदे, सुमित डफळ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. संतोष साळवे म्हणाले, ''हिंदी ही राष्ट्रभाषा असली तरी ती कुणावर लादू नये. भारत हा विविध भाषांचा देश आहे. प्रत्येक राज्याची,



भाषेची, संस्कृतीची एक वेगळी ओळख आहे आणि ती जपली गेली पाहिजे. मनसेने नेहमीच स्थानिक भाषांचा सन्मान राखण्याची भुमिका घेतली आहे. सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेणे हे लोकशाही मूल्यांना साजेसे आहे आणि जनतेच्या आवाजाचा विजय आहे.'' आरती उफाडे म्हणाल्या, ''मातृभाषेचा अभिमान बाळगणं ही आजच्या काळात आवश्यक बाब आहे. हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेणं म्हणजे भाषिक विविधतेचा स्वीकार करणं. ही केवळ भाषेची नाही, तर आपली ओळख, संस्कृती आणि अस्तित्व टिकवण्याची लढाई आहे.'' या प्रसंगी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी मराठीचा अभिमान महाराष्ट्राचा मान अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. उपस्थित नागरिकांमध्ये मिठाई वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. दिल्लीगेट परिसरात पार पडलेल्या या आनंदोत्सवात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मनसेच्या भूमिकेचे कौतुक केले.



# वारकऱ्यांच्या सेवेतून ऊर्जा मिळते- खामकर

## संत रविदास महाराज मानाच्या दिंडीचे उत्साहात स्वागत

**अहमदनगर । प्रतिनिधी**

संत रविदास महाराज यांच्या मानाच्या दोन पायी दिंड्यांचे अहिल्यानगर शहरातून प्रस्थान होत असताना चर्मकार विकास संघाच्या वतीने भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.

ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात व टाळ-मृदंगाच्या गजरात शहरात प्रवेश केलेल्या दिंड्यांमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. संत रविदास महाराजांची त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर व टाकळीमिया ते पंढरपूर अशी दोन मानाच्या दिंड्या दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरच्या वारीसाठी रवाना होतात. या दिंड्यांचे अहिल्यानगर शहरातील चर्मकार विकास संघाच्या मुख्य कार्यालय व लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयाजवळ स्वागत सोहळा मोठ्या उत्साहात पार पडतो. या वेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांनी दिंडीचे संचालक ह.भ.प. दत्तात्रय महाराज चिंधे, रामदास पठाडे, गणपत अभंग, उत्तम साबळे, हभप जनार्दन सूर्यवंशी यांचा सत्कार करताना दिंडीसाठी आर्थिक मदत दिली.

यावेळी उपस्थित प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये संतोष कानडे, अरुण गाडेकर, विनोद कांबळे, रुपेश लोखंडे, अशोक आंबेडकर, सूर्यभान शिंदे, मनिष कांबळे, संतोष जाधव, वसंत देशमुख, नंदू गायकवाड, सुहास दुर्गे, बाळासाहेब देशमुख, तसेच महिला कार्यकर्त्यांमध्ये मिनल माने, आशा गायकवाड, लक्ष्मी दुर्गे यांच्यासह मोठ्या संख्येने वारकरी भक्त सहभागी झाले होते. या वेळी बोलताना संजय खामकर म्हणाले, ''वारकऱ्यांच्या सेवेत पांडुरंगाचे दर्शन होते. त्यांच्या संगतीतून व त्यांच्या सेवाकार्यातून जीवनात एक सकारात्मक ऊर्जा मिळते. संत रविदास महाराजांचे विचार समाजात पोहचवण्याचे महत्त्वाचे कार्य ही दिंडी करत आहे.'' त्र्यंबकेश्वर दिंडी दोन दिवस, तर टाकळीमिया दिंडी एक दिवस शहरात मुक्कामी असते. या वेळी अभंग, कीर्तन, हरिपाठ आदी कार्यक्रमांनी परिसर भक्तीमय झाला होता.

शहरातील चर्मकार समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या दिंड्यांचे स्वागत केले.

## विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप

# मख़दुम सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनचा उपक्रम

**अहमदनगर । आबीद खान**

राणी सुलताना चांदबीबी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण करताना, त्यांच्या संघर्षमय व प्रेरणादायी जीवनातून शिकण्यासारखे खूप काही आहे, असे मत व्यक्त करत मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशन यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप हा अर्थपूर्ण उपक्रम राबवण्यात आला. अहमदनगर छावणी परिषदेच्या महात्मा गांधी शाळेत आयोजित या उपक्रमात अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम केवळ वह्यांचे वाटप नसून, सामाजिक बांधिलकी, शिक्षणाविषयीची जाणीव आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीचा एक छोटासा हातभार आहे, असे प्रतिपादन पटेल स्पेशालिटी क्लिनिकचे डॉ. अशपाक




पटेल यांनी यावेळी केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशफाक पटेल (पटेल स्पेशालिटी क्लिनिक), तौफिक तांबोली (अल करम हॉस्पिटल), मख़दुम सोसायटीचे अध्यक्ष आबिद दूल्हेखान, शिक्षिका सुमैय्या सय्यद, अरविंद कुडीया, शेख नविद्दुसहर, मुबीना सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक साहित्याची उपलब्धता वाढवण्याबरोबरच सामाजिक बांधिलकीचाही सकारात्मक संदेश पोहोचवला गेला. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात शफी हज उमरा टुर्स, राजकुमार गुरनानी, युनूसभाई तांबटकर, लालाभाई शेख, विकास पिटेकर, चारु ससाणे, कांचन तांबोळी, डॉ. शैलेंद्र खंडागळे, अर्जुन चौरे, सुरेश पवार, नरेश पेवाल, सारीका रघुवंशी या दानशूर व्यक्तींनी मोलाचे सहकार्य केले. प्रस्ताविक करताना आबिद खान म्हणाले, ''या वह्या म्हणजे केवळ पानं नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारी संधी आहेत. अभ्यास करा, प्रगती करा आणि आपल्या ज्ञानाने आपल्या कुटुंबाचे, शहराचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करा.'' शेवटी, ''राणी चांदबीबींसारख्या वीरांगनेची प्रेरणा घेत आपणही समाजासाठी काहीतरी चांगले करू शकतो,'' ही भावना प्रत्येकाने जपली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमैय्या सय्यद यांनी केले, तर आभार प्रदर्शन अरविंद कुडीया यांनी मानले.

# मनपा वर्धापन दिनानिमित्त डॉ. बागुल यांनी रेखाटली 'असुबा पॅटर्न' रांगोळी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त येथील सुप्रसिद्ध कलाकार डॉ. अमोल बागुल यांनी साकारलेली भव्य 'असुबा पॅटर्न' रांगोळी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेत आहे. ही रांगोळी ४० बाय ४० फूट आकाराची असून, एकूण १२५ किलो रंग, त्यातही विशेषतः २७ प्रकारचे सुगंधी रंग वापरून अवघ्या ६ तासांत डॉ. बागुल यांनी ही कलाकृती साकारली. या रांगोळीत अहिल्यानगर महानगरपालिकेचे बोधचिन्ह, तसेच महाराष्ट्र शासनाने जारी केलेले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिजन्मशताब्दीचे अधिकृत लोगो, आणि 'स्वच्छ अहिल्यानगर, सुंदर अहिल्यानगर, आपलं अहिल्यानगर - निरंतर सेवा' ही घोषवाक्ये अत्यंत




देखण्या पद्धतीने रेखाटण्यात आली आहेत. फक्त मुख्य रांगोळीच नव्हे, तर महानगरपालिकेच्या इमारतीच्या आवारात, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याभोवती व प्रवेशद्वाराजवळ रंगीबेरंगी पायघड्या रेखाटून परिसर अधिकच देखणा करण्यात आला आहे. डॉ. अमोल बागुल यांची ही रांगोळी पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली असून, ती वर्धापन दिनातील एक प्रमुख आकर्षण ठरली आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# विहिरीची नोंद करून पाणीपुरवठा सुरू करण्याच्या मागणीसाठी आंदोलन



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

भावडी गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायतीने सन १९९२ मध्ये विहीर खोदली होती. या विहिरीवरून अनुसूचित जातीतील नागरिकांना पाणीपुरवठा केला जात होता. मात्र, गावातील बाळु सोपाना शिंदे व त्यांच्या मुलांनी या विहिरीशी कोणताही संबंध नसतानाही बेकायदेशीररित्या ग्रामपंचायत दप्तरी नोंद करून, विहीरीवरील विद्युतजोडणी आणि पाइपलाइनची मोडतोड केली. त्यामुळे गेल्या १२ महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णतः बंद आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी वेळोवेळी ग्रामपंचायत व पंचायत समितीकडे लेखी व तोंडी पाठपुरावा केला. मात्र, अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

परिणामी अनुसूचित जातीतील नागरिकांना व अन्य गावकऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून, वयस्कर नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. सदर विहिरीची मालकी ग्रामपंचायतीच्या नावावर अधिकृतपणे नोंद व्हावी, यासाठी महसूल अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करून पंचनामा करावा, तसेच याबाबत जनसुनावणी आयोजित करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ३० मे २०२५ रोजी ग्रामसभेचा ठराव करून त्याची प्रत संबंधित अधिकाऱ्यांना सादर करण्यात आली होती. मात्र, अजूनही अंमलबजावणी झालेली नाही. याशिवाय, ग्रामसेवकाची बदली झाल्यानंतर नवीन ग्रामसेवक नियुक्त न केल्याने गावकारभार ठप्प झाला आहे. यावरही त्वरीत कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी आहे. १६ जून २०२५ रोजी पंचायत समितीला निवेदन देऊनही अपेक्षित कारवाई न झाल्यामुळे लहुजी शक्ती सेना व भावडी ग्रामस्थांनी ता. ३० जून रोजी पंचायत समिति कार्यालयासमोर 'हलगी बजाव आंदोलन' सुरू केले आहे.




# महिलांसाठी स्वतंत्र व्यायामशाळा असणारे बाबुजी आव्हाड एकमेव महाविद्यालय- कविता आव्हाड

## महाविद्यालयात महिला व्यायामशाळेचे उद्घाटन

**पाथर्डी । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्तुळात बाबुजी आव्हाड महाविद्यालय हे खेळाडू घडवणारे महाविद्यालय म्हणून परिचित आहे. या महाविद्यालयातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कामगिरीने महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे.

याच महाविद्यालयात महिला विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व्यायामशाळा सुरू करण्यात आलेली असून, ही सुविधा देणारे बाबुजी आव्हाड हे पुणे विद्यापीठातील एकमेव महाविद्यालय ठरले आहे. ही बाब निश्चितच अभिमानास्पद असल्याचे मत मैत्रेयी ग्रुपच्या अध्यक्षा कविता आव्हाड यांनी व्यक्त केले. या महिला व्यायामशाळेचे उद्घाटन खासदार डॉ. सुजय विखे व आमदार मोनिका राजळे यांच्या विशेष प्रयत्नातून आणि क्रीडा व युवक संचालनालय, पुणे यांच्या आर्थिक सहाय्याने पार पडले. उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर भारती आसलकर, मीरा खेडकर, पर्यवेक्षक मनीषा मिसाळ, सुषमा काकडे, राणी वाखूरे, प्राचार्य डॉ. बबन चौरे, व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विजय देशमुख उपस्थित होते. कविता आव्हाड म्हणाल्या, ''महाविद्यालयाने आजवर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवले आहेत. हर्षदा गरुड, शिवछत्रपती पुरस्कार विजेती कोमल वाकळे, योगिता खेडकर, पूनम काकडे, पायल आसलकर, आरती केदार, अंबिका वाटाडे या महिला खेळाडूंनी पदकविजेती कामगिरी करून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे.

महाविद्यालयातील क्रीडांगण, व्यायामशाळा व अन्य सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येतात. याचा सरकारी नोकरी मिळवण्यातही मोठा फायदा होत असून, विद्यार्थिनींनी या यशस्वी खेळाडूंपासून प्रेरणा घ्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ''ही व्यायामशाळा विद्यार्थिनींच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरेल. केवळ महिला विद्यार्थिनींसाठी असलेल्या या व्यायामशाळेमुळे त्या निर्धास्तपणे व्यायाम करू शकतील,'' असेही त्या म्हणाल्या.

या उपक्रमासाठी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांचे विशेष योगदान लाभले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी पूनम काकडे, सानिका शिवणकर व नुसरत शेख या विद्यार्थिनींनी प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुरेखा चेमटे, तर आभार प्रदर्शन प्रा. प्रणिता भावसार यांनी मानले.

# मुस्लिम समाजाची वारकरीसेवा:आदर्श उपक्रम

**जामखेड । रिजवान शेख**

पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनाकरीता महाराष्ट्रासह देशभरातून सर्व जाती-धर्मांतील भाविक पायी चालत पंढरपूरकडे निघतात. गावा-गावांतून ही भक्तिभावाने निघणारी दिंडी म्हणजे केवळ धार्मिक प्रवास नसून, ती सामाजिक ऐक्य व सलोख्याचं प्रतीक बनलेली आहे.



या सामाजिक सलोख्याचाच एक अद्भुत व प्रेरणादायी अनुभव जामखेड तालुक्यातील जवळा गावात दिसून आला. येथील मुस्लिम समाजबांधवांनी सामाजिक सलोखा राखत दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी पुढाकार घेतला. जवळा येथील मस्जिदमध्ये चहा व नाश्त्याची मोफत सोय करून मुस्लिम बांधवांनी वारकऱ्यांचं उत्साहात स्वागत केलं. सरदवाडी येथील श्री क्षेत्र श्रीराम देवस्थान ट्रस्ट यांच्या माध्यमातून ही दिंडी सरदवाडीपंढरपूर असा मार्ग घेत जामखेड, नान्नज, बोर्ले मार्गे जवळा येथे दाखल झाली होती. दिंडीचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान हभप तेजेराव महाराज कात्रजकर, हभप बाळासाहेब महाराज गाडे, हभप कांतिलाल गंभीरे, हभप भगवान गंभीरे, तुकाराम ओमासे यांची विशेष उपस्थिती यावेळी होती. गेल्या तीन वर्षांपासून जवळा येथील मुस्लिम समाज वारकऱ्यांची सेवा करत असून, ही सेवा ही धर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेचा आणि ऐक्याचा संदेश देणारी आहे. यंदाही वारकऱ्यांना प्रेमाने सेवा देण्यात आली. यावेळी हभप बाळासाहेब गाडे महाराज यांनी प्रतिक्रिया देताना म्हटलं, ''मुस्लिम बांधवांनी केलेल्या प्रेमपूर्वक स्वागताने आम्ही भारावून गेलो आहोत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आम्ही त्यांची सेवा आनंदाने स्वीकारत आहोत.'' सेवा उपक्रमात जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद शेख, खलील शेख, शद्रोद्दीन शेख, अहमद शेख, दिलावर शेख, आलम पठाण, तसेच आदिनाथ कारखान्याचे संचालक दशरथ हजारे, ग्रामपंचायत सदस्य एकनाथ हजारे, आणि पत्रकार संतराम सूळ आदी मान्यवरांचा मोलाचा सहभाग होता. सेवा उपक्रमात अस्लम शेख, आसिफ सय्यद, तय्याब शेख, अनस शेख, तोहीद शेख, सलमान सय्यद, अलीम शेख, फारूख आतार, सुहान पठाण, अरमान शेख, इन्नूस शेख, इकरमोद्दीन मुलाणी, अशोक पठाडे, अशपाक शेख, रामभाऊ म्हसवडकर यांचाही सक्रिय सहभाग होता. ही घटना समाजात एकतेचा आणि आपुलकीचा दीप उजळवणारी आहे. धार्मिकतेच्या जोडीने सामाजिक सलोखा जोपासणारी अशी सेवा भविष्यातही अधिक ठिकाणी आदर्श ठरावी, अशी भावना यावेळी व्यक्त झाली.

# वाढदिवसानिमित्त अनोखा उपक्रम राबविण्याचा मानस- आ.पाचपुते

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

ता. ०२ जुलै रोजी श्रीगोंदा तालुक्याचे विद्यमान आमदार विक्रम बबनराव पाचपुते यांचा वाढदिवस आहे. सध्या विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरू असल्याने आमदार पाचपुते मतदारसंघात प्रत्यक्ष उपस्थित राहू शकत नाहीत. मात्र, कार्यकर्त्यांच्या प्रेमळ आग्रहामुळे ते काष्टी येथील आपल्या निवासस्थानी सकाळी ७:०० ते दुपारी २:०० या वेळेत उपस्थित राहणार आहेत. माध्यमांशी बोलताना आमदार विक्रम पाचपुते यांनी श्रीगोंदा व नगर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी,



कार्यकर्ते व नागरिकांना नम्र आवाहन केले आहे की, वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना कोणीही फेटा, शाल, हार वा पुष्पगुच्छ न आणता एक झाड किंवा गरीब विद्यार्थ्यांसाठी वह्यांचा संच घेऊन यावा. ''आपण निसर्गाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून वाढदिवस साजरा करताना वृक्ष संवर्धन आणि शिक्षण उपक्रम राबवावा,'' असे आमदार पाचपुते म्हणाले. त्यांच्या वतीने झाडे लावण्यात येणार असून त्यांचे संगोपनही नियोजनबद्ध पद्धतीने केले जाणार आहे. तसेच, भेटवस्तूप्रमाणे आलेल्या वह्यांचे गरीब शालेय विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. शेवटी, आमदार पाचपुते यांनी नम्र विनंती केली की, वाढदिवसाची भेट म्हणून झाडाचे रोप किंवा शालेय साहित्य (विशेषतः वह्या) घेऊन यावे, जेणेकरून यामागील सामाजिक उद्देश पूर्ण होईल.

# पोलिसांचा अभिनव उपक्रम; क्यूआर कोडद्वारे नागरिकांचे अभिप्राय घेण्यास सुरुवात

## एसपी सोमनाथ घार्गे यांचे आवाहन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पोलिस सेवा अधिक प्रभावी, उत्तरदायी आणि लोकाभिमुख करण्यासाठी अहिल्यानगर पोलिसांनी एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. ता. ३० जून ते ९ जुलै २०२५ या कालावधीत नागरिकांना पोलिसांच्या कामगिरीविषयी आपला अभिप्राय थेट ऑनलाइन देण्याची संधी देण्यात येत आहे.

या उपक्रमाअंतर्गत वाहतूक व्यवस्थापन, महिला सुरक्षा, अंमली पदार्थविरोधी कारवाई आणि सायबर गुन्ह्यांवरील पोलिसांचे कार्य या चार मुख्य विभागांवर नागरिकांना स्वतंत्रपणे आपले मत नोंदवता येणार आहे. यासाठी खास क्यूआर कोड व वेबसाईट लिंक (https://www.ahmednagardistpolice.gov.in/feedback-form) उपलब्ध करून देण्यात आली आहे. महत्त्वाचे मुद्दे : फीडबॅक फॉर्म इंग्रजी किंवा मराठीत भरता येईल. नाव किंवा फोन नंबर देणे बंधनकारक नाही, मात्र संबंधित पोलीस ठाण्याचे नाव नमूद करणे आवश्यक. ५० शब्दांत अभिप्राय नोंदवण्याची मुभा. एकूण जिल्हा पोलीस कार्यप्रणालीला १० पैकी रेटिंग देता येणार. प्रत्येक विभागाला स्वतंत्रपणे गुण (१ ते १०) देता येणार.

सर्व अभिप्राय गोपनीय ठेवण्यात येणार आहेत, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले. त्यांनी सांगितले की, नागरिकांचा अभिप्राय आमच्यासाठी दिशादर्शक आहे. आपण दिलेला प्रत्येक अभिप्राय पोलीस व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवू शकतो. हा उपक्रम नागरिक आणि पोलिस यांच्यातील संवाद अधिक सशक्त करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. आपलाही अनुभव शेअर करा आणि जिल्हा पोलीस यंत्रणेचा भाग व्हा ! फीडबॅक लिंक https:// www.ahmednagardistpolice. gov.in/ feedback-form





# उद्योजक गणेश भांड शिंदेसेनेत दाखल

**देवळाली प्रवरा । शफीक बागवान**

देवळाली प्रवरा येथील चैतन्य उद्योग समुहाचे अध्यक्ष गणेश भांड यांनी काल रविवारी रात्री शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. विखे समर्थक म्हणून ओळख असलेल्या गणेश भांड यांची शिंदे गटात प्रवेश करण्याबाबत वरीष्ठ पातळीवर चर्चा सुरू होती. त्यानुसार काल हा प्रवेश सोहळा मंत्री उदय सावंत यांच्या निवासस्थानी पार पडला. यावेळी जुन्नरचे आ.शरद सोनवणे,आ. मनीषा कायंदे, दक्षिण जिल्हाध्यक्ष बाबूशेठ टायरवाले, शिवसेना अध्यात्मिक आघाडी जिल्हाध्यक्ष संपत जाधव,पांडुरंग महाराज वावीकर, शहरप्रमुख गंगाधर सांगळे आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते शिवसेना पक्षाचा पंचा घालून गणेश भांड यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. यावेळी संदीप भांड, गोपाल शिंदे प्रमोद बर्डे, संतोष येवले, संतोष घाडगे, कृष्णा भुजाडी, अर्जुन शेटे,चांगदेव खांदे, सुनील भांड, निलेश कुंभार,प्रतीक घोलप,गौरव भांड, सुमेध भांड,सोमा इथापे,सलीम शेख, कृष्णा कोबरणे,किशोर मोरे,अशोक गावडे, राजेंद्र सांगळे, सीताराम येवले, हरिभाऊ हापसे,रवींद्र बोरुडे, किरण देशमुख आदींसह कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनसुरक्षा विधेयक रद्द करण्याची मागणी

# संगमनेर, अकोलेतील संघटनांचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन



**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

जन सुरक्षा विधेयकाच्या विरोधात संगमनेर व अकोले तालुक्यातील विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी आज एकत्र येत तीव्र नाराजी व्यक्त केली. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, कामगार युनियन संगमनेर, वनकामगार संघटना तसेच किसान सभेच्या वतीने संगमनेर प्रांताधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे जन सुरक्षा विधेयक रद्द करण्याची मागणी करण्यात आली. हे विधेयक लोकशाहीविरोधी असून जनतेच्या मूलभूत हक्कांना बाधा आणणारे आहे, असा आरोप संघटनांनी केला.

या कायद्याचा वापर आंदोलक, कार्यकर्ते, पत्रकार व नागरिकांना गप्प करण्यासाठी होऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. निवेदन देताना विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी जोरदार घोषणा देत सरकारविरोधी संताप व्यक्त केला. संघटनांनी इशारा दिला की, सरकारने हा कायदा तात्काळ मागे घेतला नाही तर राज्यभर आंदोलन छेडले जाईल.

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही. शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

# इडा पिडा टळो बळीचे राज्य येवो



१ जुलै हा हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा जन्मदिन. त्यांच्या जन्मदिनानिमीत्त १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही तो कृषी दीन म्हणून संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा केला गेला. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला गेला. शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घराघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषिदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत. आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो - लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेलती जात नाही. कर्जाच्या बोझ्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो. महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत. आजच्या कृषी दिवसाच्या निमित्ताने तमाम शेतकरी बांधवांना कृषिदिनाच्या शुभेच्छा!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# एचएसआरपी नसेल तर खरेदी-विक्रीला ‘ब्रेक’

## सरकारने सर्वसामान्यांचा आवळला फास

**पुणे । शफीक बागवान**

राज्यातील एप्रिल २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नंबर पाटी (एचएसआरपी) लावण्यात येत आहे; परंतु वाहनधारकांकडून प्रतिसाद कमी असल्याने १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारकांना दिलासा मिळाला आहे. परंतु, उच्च सुरक्षा नंबर पाटी न लावलेल्या कोणत्याही जुन्या वाहनांची नूतनीकरणाशिवाय कोणतीही कामे करू नका, असे आदेश परिवहन आयुक्तांनी सर्व प्रादेशिक परिवहन विभागांना (आरटीओ) दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नंबर पाटी लावण्याचे बंधनकारक केले आहे. सर्व वाहनांना नंबरप्लेट लावण्यासाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतु, जुन्या वाहनांना सुरक्षा नंबर पाटी न बसवल्यास आरटीओत वाहनांसंदर्भात काही कामे करताना नागरिकांना अडचणी येणार आहेत. त्यामुळे वाहनधारकांनी तातडीने उच्च सुरक्षा नंबर पाटीसाठी नोंदणी करावी, असे आवाहन आरटीओकडून करण्यात आले आहे.

**उच्च सुरक्षा नंबर पाटी न लावलेल्या वाहनांना वाहन हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रामध्ये (आरसी) पत्ता बदल करणे, वित्त बोजा चढवणे व उतरवणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे, ना हरकत प्रमाणपत्र जारी करणे, वाहनांमध्ये बदल करणे ही कामे करू नका. ज्या नागरिकांनी सुरक्षा नंबर पाटीसाठी नोंदणी केली आहे, त्यांची अडवणूक करू नये. त्यांची खातरजमा करून कामे वेळेत करून द्यावीत.**

## पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**श्रीरामपुर । शफीक बागवान**

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील निर्देशानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील सहकार पुरस्कारासाठी पात्र सहकारी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. या संदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर. मंगेश सुरवसे व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर . रवि गडेकर यांनी आवाहन केले आहे की, श्रीरामपूर तालुक्यातील सर्व सहकारी संस्थांनी आपले प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक निबंधक कार्यालयात दि. १८ जुलै २०२५ पर्यंत सादर करावेत.

सदर प्रस्ताव शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार व आवश्यक कागदपत्रांसह सादर करणे अनिवार्य आहे. अपूर्ण प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत. प्राप्त प्रस्तावांची छाननी समितीमार्फत करण्यात येईल व अंतिम निर्णय शासन स्तरावर घेतला जाईल. सर्व सहकारी संस्थांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सुरवसे व सहाय्यक निबंधक रवी गडेकर यांनी केले आहे

### प्रदूषणमुक्त महाराष्ट्रासाठी पुढाकार

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची ७३८६ ईव्ही कारने अधिवेशनात हजेरी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आजपासून प्रदूषणमुक्त महाराष्ट्रासाठी एक सकारात्मक पाऊल उचलले आहे. त्यांनी MH01 EV 7386 या इलेक्ट्रिक वाहन (EV) वापरण्यास सुरुवात केली असून, याच नव्या वाहनातून त्यांनी आज रामटेक निवासस्थानावरून थेट विधिमंडळात अधिवेशनासाठी प्रस्थान केले. ‘‘आधी केले, मग सांगितले‘‘ या उक्तीप्रमाणेच पंकजा मुंडे यांनी कृतीतून आदर्श घालून दिला आहे. इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य दिल्यास प्रदूषणावर नियंत्रण ठेवता येऊ शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच, राज्यातील जनतेनेही पर्यावरण रक्षणासाठी आणि स्वच्छ महाराष्ट्रासाठी अशा पर्यायी वाहतूक साधनांचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, आज सकाळी अधिवेशनाला जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या नवीन ईव्ही कारचे विधीवत पूजन केले. यावेळी महिंद्रा कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून त्यांना कारची चावी औपचारिकपणे सुपूर्त करण्यात आली.पंकजा मुंडे यांच्या या पावलामुळे राज्यातील इतर मंत्र्यांना व जनतेलाही पर्यावरणपूरक वाहनांचा विचार करण्यास प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# गुळवेसरांनी फुलविली लेखनकला

मला शालेय जीवनापासूनच गणित विषय खूप आवडायचा. गणित विषयात दहावीला असताना सर्वाधिक गुण घेऊन मी प्रथम आलो होतो. शालेय जीवनात मराठी विषयाची तेवढी आवड नसल्यामुळे मराठी विषयाकडे दुर्लक्ष करायचो आणि गणित विषयाकडे फोकस करायचो. दहावीला मराठी विषयात म्हणावे तेवढे गुण न मिळाल्यामुळे मी खूप नाराज झालो. एके दिवशी अचानक गावातील खंडेश्वरी सार्वजनिक वाचनालयात पेपर वाचण्यासाठी मित्रांबरोबर गेलो. तेव्हा माझ्या हातात पुण्यनगरी पेपर आला आणि पेपर वाचत असताना संपादकीय पानावर माझे गणित विषयाचे शिक्षक बबनराव गुळवे गुरुजी यांचा नावासह लेख दिसला. तो लेख मी मन लावून वाचला. माझ्या मनाला तो लेख खूप खूप आवडला. सरांची लेखनशैली अतिशय सुंदर व आकर्षक होती. कोणाच्याही मनाला भावणारी व कोणालाही मंत्रमुग्ध करणारी होती. त्यांनी तो लेख कोणालाही समजेल अशा साध्या व सरळ भाषेत लिहिला होता. लेख वाचताना माझ्या लक्षात आले की, गुळवेसर गणित विषयाचे तज्ञशिक्षक तर आहेतच पण एक उत्तम व दर्जेदार लेखक आहेत. त्यांची विचारसरणी व लेखनशैली भल्या भल्या लेखकांना थक्क करणारी आहे. तेव्हापासून मी ठरवले की, आता आजपासून दररोज न चुकता वाचनालयात जाऊन सरांचे लेख वाचायचे. तेव्हापासून मी दररोज सकाळी वाचनालयात जाऊन पहिल्यांदा हजेरी लावायचो. गुळवेसर पुण्यनगरी, लोकमत, एकमत, सकाळ आणि पुढारी या नामांकित वर्तमानपत्रात दररोज लेखन करायचे. मी दररोज सकाळी वाचनालयात जाऊन हे सर्व पेपर झपाटल्यासारखे वाचायचो. पेपर हातात घेतला की, अगोदर संपादकीय पान पहायचो. त्या पानावर सरांचा लेख दिसला की, माझ्या मनाला समाधान वाटायचे. माझे मन आनंदाने प्रफुल्लित व्हायचे. तो लेख मी अधाशासारखा वाचून काढायचो. जोपर्यंत तो लेख मला तोंडपाठ होत नाही तोपर्यंत तो लेख मी वाचत असे. सरांचे बरेच लेख व टर्निंग पॉईंट मला आजही तोंडपाठ आहेत. त्यांच्या बऱ्याच लेखांचे कात्रण काढून मी लेखसंग्रह तयार केला. ज्यावेळी मला बोर झाल्यासारखे वाटते तेव्हा मी सरांचे लेख वाचत असतो. लेख वाचल्यावर माझ्या मनाला एक वेगळाच आनंद मिळतो. मला लेखन करायला प्रेरणा व ऊर्जा मिळते. ज्या दिवशी पेपर वाचायला गेल्यावर सरांचा लेख दिसला नाही, त्यादिवशी माझा मूड खूप खराब व्हायचा आणि माझे मन नाराज व्हायचे, तो दिवस अतिशय बोर जायचा. तेव्हा मी सरांचे जुने लेख काढून वाचत बसायचो. तेव्हा बऱ्यापैकी माझा मूड फ्रेश व्हायचा. ज्या दिवशी वाचनालय बंद असेल, त्यादिवशी मी सर ज्या वर्तमानपत्रात लेखन करतात ते सर्व पेपर विकत घेऊन घरीच झपाटल्यासारखे वाचत असे. सरांचे लेख वाचून माझ्यासुद्धा ज्ञानात भर पडत गेली. मलासुद्धा वर्तमानपत्रात लेखन करावे वाटू लागले. सुरुवातीला मला लेखनकला अवगत नसल्यामुळे लिहायला थोडे अवघड जाऊ लागले. पण थोड्या दिवसांनी जमतजमत लेख लिहायला जमू लागले. म्हणतात ना आजचा वाचक, उद्याचा लेखक असतो. असेच माझ्याही बाबतीत झाले. माझा लिहिलेला पहिला प्रकाशित लेख होता, बांधवांनो स्त्रीभ्रूणहत्या टाळा, तो लेख मी कागदावर लिहून पोस्टाने एकमत साक्षी पेपरला पाठवला आणि तो लेख दुसऱ्याच दिवशी छापून पण आला. मला खूप खूप आनंद झाला. मी सुद्धा चांगल्या प्रकारे लिहू शकतो याची प्रचिती आली. तेव्हापासून मी गुळवे सरांचे लेख रोज मन लावून वाचू लागलो. त्यांच्या विचारांवर विचार करून लेख लिहिण्याचा प्रयत्न करू लागलो. कालांतराने मला पण लेख लिहायला जमू लागले. सरांचा लेख वाचला की, मलासुद्धा विषय सुचू लागले. म्हणजे सरांच्या विचारांवर विचार करून लेख लिहिणे हा माझा आवडता छंद झाला आहे. आतापर्यंत मी सरांचे अनेक लेख वाचले आहेत. त्यामुळे माझा शब्दसंग्रह प्रचंड वाढला. मलासुद्धा छानपैकी लेखनकला जमत आहे. सरांची प्रेरणा घेऊन मी दररोज विविध वर्तमानपत्रात लेखन करत असतो. माझे सुद्धा आतापर्यंत विविध वर्तमानपत्रात खूप लेख प्रकाशित झाले आहेत. माझी सुद्धा एक चांगला व दर्जेदार लेखक म्हणून ओळख निर्माण झाली आहे.बारावीला एस.एल. म्हणून मी मराठी विषय निवडला आणि बारावी बोर्ड परीक्षेत मी मराठी विषयात वर्गात प्रथम आलो. मराठी विषय हा आता माझ्या आवडीचा विषय बनला आहे. आणि बारावीपासून मी साहित्यक्षेत्रात एक उत्कृष्ट लेखक म्हणून कार्यरत आहे. मला अनेक सन्मानपत्र मिळाले आहेत. महाराष्ट्रातील विविध वाचक मित्र माझे लेख वाचून मला फोन करतात. माझा लेख आवडल्याचे सांगतात. मला मनःपूर्वक अभिनंदन करून आणखी लेख लिहिण्यास प्रेरित करतात. माझा वाचक वर्ग खूप मोठा आहे. ज्या दिवशी वर्तमानपत्रात माझा लेख आला नाही, त्या दिवशी मला वाचकांचे फोन येतात आणि लेख लिहिण्यास सांगतात. तेव्हा मीसुद्धा निरंतर लेखन करतोय. काही वर्तमानपत्रांचे संपादक महोदय माझा लेख पाठवण्यात खूप दिवस गॅप झाला तर मला फोन करून सांगतात की, तुम्ही लिहिणे का थांबवले आहे?तुमच्यासारख्या लेखकाची समाजाला खूप गरज आहे. तेव्हा मी झपाट्याने वाचन व मनन करून लेख लिहितो आणि वर्तमानपत्रांना पाठवतो. गुळवे सरांचे लेख वाचून मी सुद्धा दर्जेदार लेखक झालोय. म्हणून सरांच्या दर्जेदार व निर्भिड लेखणीला माझा मनःपूर्वक सलाम! सरांच्या लेखांनी माझी लेखनकला फुलवली. म्हणून सरांच्या लेखणीला व विचारांना साष्टांग दंडवत करून सरांचे खूप खूप आभार मानतो. सरांनी आम्हा वाचकांसाठी खूप खूप लिहावे आणि ज्ञानाचे भांडार खुले करून द्यावे, ही विनंती.








**बुध्दभूषण कांबळे**
खंडाळी, ता.अहमदपूर,
जिल्हा लातूर.
७४९८७१५६६१


**गुरुसंवाद**

# अर्बन बँक ठेवीदारांसाठी ग्राहक सहाय्यता केंद्र

### ₹५ लाखांवरील ठेवींच्या ५०% रकमेचे लवकरच वितरण

**अहमदनगर । प्रतिनिधी**

आर्थिक अडचणीत सापडलेल्या नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांसाठी दिलासादायक बातमी आहे. ₹५ लाखांवरील ठेवी असलेल्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवींपैकी ५० टक्के रक्कम लवकरच वितरित करण्यात येणार असल्याची माहिती ग्राहक सहाय्यता केंद्राने दिली आहे. यासंदर्भात आपले नाव ठेवीदार यादीत समाविष्ट आहे की नाही, याची खातरजमा करण्यासाठी ठेवीदारांनी नगर अर्बन बँकेच्या प्रधान कार्यालयाशी ०२४१-२३४३६४१, ०२४१-२३४३६४२ या क्रमांकावर संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी ठेवीदारांनी मिलिंद अंचवले यांच्याशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ या कार्यालयीन वेळेत संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, बँक बचाव समितीने ठेवीदारांना आवश्यक त्या सर्व माहितीसाठी ९४२३७९३३२१ या क्रमांकावरही संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत गेल्या काही काळात चिंता व्यक्त केली जात होती. मात्र, ५०% रक्कम वितरणाची ही प्रक्रिया ठेवीदारांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे.




# स्त्री मुक्ती चळवळीला ५० वर्षे

## राज्यस्तरीय परिषदेसाठी आज पत्रकार परिषद

### शारदा साठे यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील स्वायत्त स्त्री चळवळीला ५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ‘‘महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद‘‘ आयोजित करण्यात येत आहे. या परिषदेबाबत माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद मंगळवारी ता. १ जुलै २०२५ रोजी दुपारी ३ वाजता मुंबई पत्रकार संघ येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत राज्यभरातील स्त्री चळवळीत सहभागी संघटना, संस्था व व्यक्ती एकत्र येणार असून, २०-२१-२२ डिसेंबर २०२५ रोजी मुंबईत ही भव्य परिषद होणार आहे. सप्टेंबर २०२४ पासून परिषदेची तयारी सुरु असून, विविध कार्यक्रम, मोहिमा, प्रादेशिक परिषदा, उपक्रम आणि प्रकाशनांद्वारे ही चळवळ अधिक व्यापक करण्यात येणार आहे. ‘‘स्त्री मुक्तीचा आवाज राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचावा, यासाठी ही पत्रकार परिषद अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांच्या सहकार्यानेच हा संदेश जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचेल,’’ असे अध्यक्ष शारदा साठे यांनी सांगितले.

